पृ.क्र.:तंशिसं/विकाना/आस्था/२०२१/ ११५
दिनांकः 25 MAR 2021

प्रत-माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

१. प्राचार्य, शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय, नागपूर.
२. शैक्षणिक विभाग तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर सदर आदेश नागपूर जिल्हयातील (ग्रामिण भागातील) पदवि व पदविका संस्थेस परिपत्रीत करण्याकरीता.

(डॉ. म.भा.डायगव्हाणे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
## जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर

फोन नंबर ०७१२/२५६२६६८
ई-मेल rdc_nagpur@rediffmail.com

क्र.अ.जि.दं/गृह/कक्ष १४-२/कावि-३६७/२०२१
दिनांक:-०६/०३/२०२१.

**वाचा :**

1) साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897 चे कलम 2,3,4.
2) आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005
3) या कार्यालयाद्वारे निर्गमित करण्यात आलेले दिनांक 17/03/2020 ते दिनांक 31/12/2020
4) या कार्यालयाचे पत्र क्र.ADM/Home/Sec 14(2)/DMA/WS 84/2021 दिनांक 18/01/2021.
5) या कार्यालयाचे पत्र क्र.अजिदं/गृह/कक्ष 14(2)/कावि149/2021 दिनांक 22/01/2021.
6)या कार्यालयाचे पत्र क्र.ADM/Home/Sec 14(2)/DMA/WS 183/2021 दिनांक 01/02/2021.
7) या कार्यालयाचे पत्र क्र.ADM/Home/Sec 14(2)/DMA/WS 327/2021 दिनांक 28/02/2021.
8) या कार्यालयाचे पत्र क्र.अजिदं/गृह/कक्ष 14(2)/कोरोना/कावि 30/2021 दिनांक 20/02/2021
9) या कार्यालयाचे पत्र क्र.अजिदं/गृह/कक्ष 14(2)/कावि 289/2021 दिनांक 22/02/2021.
10) या कार्यालयाचे पत्र क्र.अजिदं/गृह/कक्ष 14(2)/कावि 325/2021 दिनांक 26/02/2021.
11)या कार्यालयाचे पत्र क्र.अजिदं/गृह/कक्ष 14(2)/कावि 362/2021 दिनांक 04/03/2021.
12) या कार्यालयाचे पत्र क्र.अजिदं/गृह/कक्ष 14(2)/कावि 366/2021 दिनांक 05/03/2021.

आदेश

**ज्याअर्थी** कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 आणि साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 अन्वये प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अमंलबजावणी करण्यासाठी सर्व जिल्हयांमध्ये प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहे.

**आणि ज्याअर्थी,** नागपूर जिल्हयात कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता त्यास प्रतिबंध करण्यास्तव अवाश्यक उपाययोजना करणे आवश्यक असल्याने संदर्भ क्र. 9 च्या आदेशान्वये दिनांक 07 मार्च 2021 पर्यंत प्रतिबंध लावण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले होते.

**आणि ज्याअर्थी,** सध्यास्थितीत कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता संबंधित प्रतिबंधात्मक उपाययोजना आणखी काही कालावधीकरीता वाढविणे/ सुरू ठेवणे आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी रविंद्र ठाकरे, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नागपूर, साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 व आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे

//2//

सहसंचालक तंत्र शिक्षण
विभागीय कार्यालय, नागपूर.
आवक क्रमांक....1743.........
दिनांक...2-3-MAR-2021.....

कलम 30 व 34 अन्वये मला प्राप्त अधिकारांचा वापर करून कोविड-19 मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता **नागपूर जिल्हयात (महानगरपालिका क्षेत्र वगळून)** खालील उपाययोजना करण्यास्तव आदेशित करण्यात येत आहे.

1) नागपूर जिल्हयातील ग्रामिण भागातील सर्व शाळा, महाविद्यालये, प्रशिक्षण संस्था ( कौशल्य विकास प्रशिक्षण संस्था) व इतर तत्सम संस्था यांना विद्यार्थ्यांची तासिका घेण्यास दिनांक 14 मार्च 2021 पर्यत प्रतिबंध करण्यात येत आहे. तथापि या संस्थाद्वारे ऑनलाईन स्वरूपात कामकाज सुरू ठेवता येईल. शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना ऑनलाईन तासिका घेण्यास उपस्थित राहण्याकरीता प्रतिबंध राहणार नाही.

2) नागपूर जिल्हयातील ग्रामिण भागातील सर्व कोचिंग क्लासेस/शिकवणी वर्ग यांना तासिका घेण्यास दिनांक 14 मार्च 2021 पर्यत प्रतिबंध करण्यात येत आहे. तथापि या संस्थाद्वारे ऑनलाईन स्वरूपात कामकाज सुरू ठेवता येईल.

3) नागपूर जिल्हयातील ग्रामिण भागातील सर्व आठवडी बाजार (जीवनावश्यक वस्तु वगळता) बंद ठेवण्यात येत आहे.

4) नागपूर जिल्हयातील ग्रामिण भागातील वैद्यकीय सेवा, वृत्तपत्र,मिडीया संदर्भातील सेवा, दुध विक्री व पुरवठा, भाजीपाला विक्री व पुरवठा, फळे विक्री व पुरवठा, पेट्रोलपंप, गॅस एजन्सी, सर्वप्रकारच्या वाहतूक सेवा, बांधकामे उद्योग व कारखाने, किराणा दुकाने (फक्त Stand Alone स्वरूपातील) , चिकन मटन, अंडी व मास दुकाने, वाहन दुरूस्ती करणे/ वर्कशॉप, पशुखाद्य दुकाने, बॅक व पोस्ट सेवा संदर्भात त्यांचे नियमानुसार सेवा सूरू ठेवण्यास मुभा राहील या अत्यावश्यक सेवा वगळून इतर बाजारपेठा व दुकाने शनिवारी दिनांक 13 मार्च 2021 रोजी व रविवारी दिनांक 14 मार्च 2021 रोजी बंद राहतील.

5) नागपूर जिल्हयातील ग्रामिण भागातील सर्व मंगल कार्यालय/सभागृह/लॉन/रिसॉर्ट/हॉटेल सेलिब्रेशन हॉल या ठिकाणी होणारे लग्न समारंभाचे आयोजनास दिनांक 14/03/2021 पर्यंत याद्वारे प्रतिबंध घालण्यात येत आहे. दिलेल्या निर्देशाचे पालन न केल्यास संबंधित मंगल कार्यालय/ सभागृह/ लॉन/ रिसॉर्ट/हॉटेल सेलिब्रेशन हॉल यांचे मालक कार्यवाहीस पात्र राहतील.

6) नागपूर जिल्हयातील ग्रामिण भागातील धार्मिक सभा, राजकीय सभा,सामाजिक व सांस्कृतिक

कार्यक्रमांवर दिनांक 14 मार्च 2021 पर्यंत या आदेशाद्वारे प्रतिबंध घालण्यात येत आहे.

7) रेस्टांरेट/खाद्यगृह/हॉटेल/बार हे एकूण बैठक क्षमतेच्या 50% क्षमतेमध्ये रात्री 9 वाजेपर्यंत सुरू ठेवता येईल.

8) सर्व प्रकारचे ऑनलाईन सेवा( खाद्य पदार्थ, औषधी व इतर) पुरविण्यावर प्रतिबंध राहणार नाही.

9) उपरोल्लेखित बाबी वगळता उर्वरीत बाबींकरीता यापूर्वी या कार्यालयाद्वारे निर्गमित करण्यात आलेले आदेश, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण द्वारे (Easing of Restriction and Phase-wise opening of Lockdown ( MISSION BEGIN AGAIN) दिलेले निर्देश / SOP चे पालन करणे आवश्यक राहील.

वरील आदेशाचे पालन न करणा-या व्यक्तींवर आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 51 व 56 तसेच भारतीय दंड संहिता चे कलम 188 अंतर्गत आवश्यक दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

सदर आदेश आज दिनांक 06/03/2021 रोजी 11.00 वाजता माझ्या सही व शिक्क्याने पारित करीत आहे.

(रविंद्र ठाकरे)
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
नागपूर

प्रतिलीपी माहितीस्तव सादर.

1) मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
2) मा. पोलीस आयुक्त, नागपूर.
3) मा. आयुक्त, महानगरपालिका नागपूर

प्रत- माहीती व आवश्यक कार्यवाहीस.

1) मुख्य कार्यपालन अधिकारी, जि. प. नागपूर
2) पोलीस अधिक्षक, नागपूर (ग्रामिण)
3) कुल सचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर/ पंजाबराव कृषि विद्यापीठ, नागपूर / पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
4) उपविभागीयअधिकारी, (सर्व)
5) उपसंचालक( उच्च शिक्षण), शिक्षण विभाग, नागपूर
6) सहसंचालक, प्रादेशिक तंत्रशिक्षण विभाग, नागपूर
7) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. नागपूर
8) तहसिलदार, (सर्व)

-स्वा/-
(रविंद्र ठाकरे)
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
नागपूर

[illegible]
[illegible]
........................[illegible]........
..............................................

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
# जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर

फोन नंबर ०७१२/२५६२६६८
ई-मेल rdc_nagpur@rediffmail.com

क्र.अ.जि.दं/गृह/१४-२/कावि-२८९ /२०२१
दिनांक:- २२ /०२/२०२१.

**वाचा :**

1) साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897 चे कलम 2,3,4.
2) आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005
3) या कार्यालयाद्वारे निर्गमित करण्यात आलेले दिनांक 17/03/2020 ते दिनांक 31/12/2020
4) या कार्यालयाचे पत्र क्र.ADM/Home/Sec 14(2)/DMA/WS 84/2021 दिनांक 18/01/2021.
5) या कार्यालयाचे पत्र क्र.अजिदं/गृह/कक्ष 14(2)/कावि149/2021 दिनांक 22/01/2021.
6) या कार्यालयाचे पत्र क्र.ADM/Home/Sec 14(2)/DMA/WS 183/2021 दिनांक 01/02/2021.
7) या कार्यालयाचे पत्र क्र.अजिदं/गृह/कक्ष 14(2)/कोरोना/कावि 30/2021 दिनांक 20/02/2021
8) दिनांक 22/02/2021 रोजी मा. ना. डॉ. श्री. नितीन राऊत, उर्जा मंत्री तथा पालकमंत्री, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आलेली सभा.

**<u>सुधारीत आदेश</u>**

**ज्याअर्थी** कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 आणि साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 अन्वये प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अमंलबजावणी करण्यासाठी सर्व जिल्हयांमध्ये प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहे.

**आणि ज्याअर्थी,** सध्या स्थितीत कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असल्याचे आढळून येत आहे. त्याअनुषंगाने, दिनांक 16/02/2021 रोजी झालेल्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंग मध्ये मा. मुख्यमंत्री महोदयांनी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करणेबाबत निर्देश दिले आहे.

**आणि ज्याअर्थी,** शाळा /महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये कोरोना विषाणूचे संक्रमण वाढत असल्याचे आढळून येत आहे तसेच लग्न समारंभ, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय सभांमध्ये मास्कचा वापर व सोशल डिस्टसिंगचे पुर्णपणे पालन होत नसल्याचे निदर्शनास आले असल्याने संपूर्ण नागपूर जिल्हयात कोरोना विषाणूचे संक्रमणात वाढ होत असल्याचे आढळून येत आहे.

त्याअर्थी, **मी रविंद्र ठाकरे, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नागपूर, साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 व आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30 व 34 अन्वये मला प्राप्त अधिकारांचा वापर करून कोविड-19 मुळे उद्भवलेल्या**

//2//

सहसंचालक तंत्र शिक्षण
विभागीय कार्यालय, नागपूर.
आवक क्रमांक ....1740........
दिनांक 23 MAR 2021.....

संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता नागपूर जिल्हयात (महानगरपालिका क्षेत्र वगळून) खालील उपाययोजना करण्यास्तव आदेशित करण्यात येत आहे.

1) नागपूर जिल्हयातील ग्रामिण भागातील सर्व शाळा, महाविद्यालये, प्रशिक्षण संस्था( कौशल्य विकास प्रशिक्षण संस्था) व इतर तत्सम संस्था यांना विद्यार्थ्यांची तासिका घेण्यास दिनांक 7 मार्च 2021 पर्यत प्रतिबंध करण्यात येत आहे. तथापि या संस्थाद्वारे ऑनलाईन स्वरूपात कामकाज सुरू ठेवता येईल. शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना ऑनलाईन तासिका घेण्यास उपस्थित राहण्याकरीता प्रतिबंध राहणार नाही.

2) नागपूर जिल्हयातील ग्रामिण भागातील सर्व कोचिंग क्लासेस/शिकवणी वर्ग यांना तासिका घेण्यास दिनांक 7 मार्च 2021 पर्यत प्रतिबंध करण्यात येत आहे. तथापि या संस्थाद्वारे ऑनलाईन स्वरूपात कामकाज सुरू ठेवता येईल.

3) नागपूर जिल्हयातील ग्रामिण भागातील सर्व आठवडी बाजार (जीवनावश्यक वस्तु वगळता) बंद ठेवण्यात येत आहे.

4) नागपूर जिल्हयातील ग्रामिण भागातील वैद्यकीय सेवा, वृत्तपत्र, दुध, भाजीपाला फळे, पेट्रोलपंप व इतर अत्यावश्यक सेवा वगळून इतर बाजारपेठा व दुकाने दर शनिवारी व रविवारी दिनांक 7 मार्च 2021 पर्यंत बंद राहतील.

5) नागपूर जिल्हयातील ग्रामिण भागातील सर्व मंगल कार्यालय/सभागृह/लॉन/रिसॉर्ट/हॉटेल सेलिब्रेशन हॉल या ठिकाणी होणारे लग्न समारंभाचे आयोजनास दिनांक 25/02/2021 ते 07/03/2021 पर्यंत याद्वारे प्रतिबंध घालण्यात येत आहे. दिनांक 20/02/2021रोजीचे आदेशानुसार दिनांक 22/02/2021 ते 24/02/2021 रोजी पर्यंत दिलेल्या निर्देशाचे पालन न केल्यास संबंधित मंगल कार्यालय/सभागृह/लॉन/रिसॉर्ट/हॉटेल सेलिब्रेशन हॉल यांचे मालक कार्यवाहीस पात्र राहतील.

6) नागपूर जिल्हयातील ग्रामिण भागातील धार्मिक सभा, राजकीय सभा,सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांवर दिनांक 7 मार्च 2021 पर्यंत या आदेशाद्वारे प्रतिबंध घालण्यात येत आहे.

7) रेस्टांरेट/खाद्यगृह/हॉटेल/बार हे एकूण बैठक क्षमतेच्या 50% क्षमतेमध्ये रात्री 9 वाजेपर्यंत सुरू ठेवता येईल.

//3//

8) सर्व प्रकारचे ऑनलाईन सेवा( खाद्य पदार्थ, औषधी व इतर) पुरविण्यावर प्रतिबंध राहणार नाही.

9) उपरोल्लेखित बाबी वगळता उर्वरीत बाबींकरीता यापूर्वी या कार्यालयाद्वारे निर्गमित करण्यात आलेले आदेश, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण द्वारे (Easing of Restriction and Phase-wise opening of Lockdown ( MISSION BEGIN AGAIN) दिलेले निर्देश / SOP चे पालन करणे आवश्यक राहील.

वरील आदेशाचे पालन न करणा-या व्यक्तींवर आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 51 व 56 तसेच भारतीय दंड संहिता चे कलम 188 अंतर्गत आवश्यक दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**सदर आदेश आज दिनांक 22/02/2021 रोजी 19.00 वाजता माझ्या सही व शिक्क्याने पारित करीत आहे.**

स्वा/-
(रविंद्र ठाकरे)
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
नागपूर

**प्रतिलीपी माहितीस्तव सादर.**

१. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
२. मा. पोलीस आयुक्त, नागपूर.
३. मा. आयुक्त, महानगरपालिका नागपूर

**प्रत- माहीती व आवश्यक कार्यवाहीस.**

१. मुख्य कार्यपालन अधिकारी, जि. प. नागपूर
२. पोलीस अधिक्षक, नागपूर (ग्रामिण)
३. कुल सचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर/ पंजाबराव कृषि विद्यापीठ, नागपूर / पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
४. उपविभागीयअधिकारी, (सर्व)
५. उपसंचालक( उच्च शिक्षण), शिक्षण विभाग, नागपूर
६. सहसंचालक, प्रादेशिक तंत्रशिक्षण विभाग, नागपूर
६. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. नागपूर
७. तहसिलदार, (सर्व)

2743

(रविंद्र खजांजी)
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा
मु.का.अ.जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
नागपूर